**राज्य निवडणूक आयोग,महाराष्ट्र**
नवीन प्रशासकीय भवन, मंत्रालयासमोर,
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरू चौक,
मुंबई- ४०० ०३२.
दिनांक : १७/११/२०१७.

**आ दे श**

क्रमांक-रानिआ/नप-२०१६/प्र.क्र.३७/का-६. - ज्याअर्थी, भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २४३ के व २४३ झेडए नुसार राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचे अधिक्षण, संचालन व नियंत्रण यांची जबाबदारी राज्य निवडणूक आयोगावर सोपविण्यात आलेली आहे;

२. आणि ज्याअर्थी, राज्य निवडणूक आयोगाने आदेश क्रमांक-रानिआ/नप-२०१६/प्र.क्र.३७/का-६, दिनांक २१/१०/२०१६ अन्वये उमेदवाराने नगरपरिषदा, नगरपंचायती निवडणुकांमध्ये उमेदवारांनी करावयाची खर्चाची मर्यादा विहित केली आहे;

३. आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी (सुधारणा व पुढे चालू ठेवणे) अध्यादेश सन २०१७ अन्वये नगरपंचायतीच्या अध्यक्ष पदाकरिता थेट निवडणूक घेण्याची तरतूद केली आहे;

४. आणि ज्याअर्थी, या सुधारणानुसार महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ (१९६५ चा महा. ४०) चे कलम ३४१-ब-१अ च्या पोट कलम ३ नुसार अध्यक्षाची निवडणूक नगरपंचायतीच्या सार्वत्रिक निवडणुकीबरोबर एकाचवेळी घेण्यात येईल आणि नगरपंचायतींच्या निवडणुका घेण्यासंदर्भातील कार्यपध्दती अशा निवडणुकीस, योग्य त्या फेरफारांसह, लागू होईल अशी तरतूद आहे;

५.  आणि त्याअर्थी, नगरपंचायतींच्या अध्यक्ष पदाकरिता थेट निवडणुकीमध्ये उमेदवारांनी करावयाच्या खर्चाची मर्यादा निश्चित करणे आवश्यक आहे. त्याकरिता राज्य निवडणूक आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे :-

**आ दे श**

६.१  नगरपंचायतींच्या सदस्य पदाच्या निवडणुकीकरिता उमेदवारांनी करावयाच्या खर्चाची मर्यादा राज्य निवडणूक आयोगाचे आदेश क्रमांक-रानिआ/नप-२०१६/प्र.क्र.३७/का-६, दिनांक-२१/१०/२०१६ मध्ये निश्चित केल्याप्रमाणेच राहील.

६.२  नगरपंचायतीच्या अध्यक्ष पदाच्या निवडणुकीकरिता उमेदवारांनी करावयाच्या खर्चाची मर्यादा रुपये ४.०० लाख इतकी निश्चित करण्यात येत आहे.

मा. राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

( री. वि. फणसेकर )
अवर सचिव,
राज्य निवडणूक आयोग

प्रति,

१. प्रधान सचिव (२), नगरविकास विभाग, मंत्रालय, मुंबई:- ३२
२. संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय, वरळी, मुंबई-२५
३. विभागीय आयुक्त तथा प्रादेशिक संचालक, (सर्व)
४. जिल्हाधिकारी (सर्व)(मुंबई शहर व मुंबई उपनगर जिल्हा वगळून)
५. मुख्याधिकारी, नगरपंचायती (सर्व)
६. मा. राज्य निवडणूक आयुक्त यांचे स्वीय सहायक
७. सचिव, राज्य निवडणूक आयोग यांचे स्वीय सहायक
८. राज्य निवडणूक आयोगातील सर्व कार्यासने
९. निवड नस्ती (कार्या-६)